# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

**( महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक स्वायत्त संस्था )**

शातंको/शै स क /सम सत्र/२०२१-२२/ 495 दि. **१ फेब्रुवारी २०२२**

# विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी सुचना

विषय : **संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ग प्रत्यक्षरित्या ऑफलाईन पद्धतीने सुरु करण्याबाबत**

संदर्भ: १) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण /२०२१/प्र. क्र. ६/वि शि - ३ दि. २५. ०१. २०२२

उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकान्वये, ज्या ठिकाणी कोविड १९ चा प्रादुर्भाव कमी आहे त्या ठिकाणी शैक्षणिक संस्थातील नियमित वर्ग जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांच्याशी विचारविनिमय करून व संदर्भिय परिपत्रकामधे नमूद मार्गदर्शक सूचनांचे पालन करून दिनांक ०१ फेब्रुवारी २०२२ पासून सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांचे/विद्यार्थिनींचे कोविड-१९ च्या लसींचे दोन्ही डोसेस पूर्ण आहेत अश्याच विध्यार्थी/विद्यार्थिनीना नियमित वर्गास उपस्थित राहाणेची परवानगी आहे.

संस्थेतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनीना सूचित करण्यात येते कि आपले शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील **सम सत्र (EVEN 2021-22)** हे दिनांक **२१ फेब्रुवारी २०२२** पासून सुरु होत आहे. त्याअनुषंगाने ज्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचे कोविड-१९ लसीकरण (दोन डोसेस) अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांनी लवकरात लवकर लसींचे दोन्ही डोसेस पूर्ण करावेत. जेणेकरून ज्या वेळी संस्थेमध्ये प्रत्यक्ष नियमित वर्ग सुरु होतील त्यावेळी सर्वांना उपस्थित राहता येईल.

विषम सत्र- २०२१-२०२२ ची ऑनलाईन लेखी परीक्षा संपलेनंतर, संस्थेच्या विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी संस्थेमध्ये कोविड-१९ लसीकरण शिबीराचे आयोजन करण्यात येईल. याबाबत सर्वांना योग्यवेळी कळविण्यात येईल.

**डॉ. डी. एम. गर्गे**
प्र. प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

**प्रत:**

१) सर्व विभाग प्रमुख यांना विभागातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनींना व्हाट्सअँप / मेल द्वारे पाठवण्याकरिता
२) ऑफिस / स्टुडंट्स सेकशन यांना माहितीकरिता
३) विभाग प्रमुख माहिती तंत्रज्ञान यांना - संस्थेच्या website वर अपलोड करणेकरीता